## सायबर क्राईम जनजागृतीनिमित्त

# सायफाय करंडकाची अंतिम फेरी १६ रोजी पुण्यात होणार

पुणे, दि. ६ (प्रतिनिधी) - सायबर गुन्ह्यांसाठी महाविद्यालयीन तरुणांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी क्वीकहिल फाऊंडेशन आणि महाराष्ट्र सायबर पोलिसांच्या वतीने 'सायफाय करंडक' ही एकपात्री नाट्यस्पर्धा आयोजित केली आहे. याची अंतिम फेरी पुण्यात १६ डिसेंबर रोजी होणार आहे.

थिएटर अकादमीच्या मुकुंदनगर येथील महाराष्ट्र मंडळ शाळेच्या आवारातील 'सकस ललीत कलाघर' या नाट्यगृहात ही अंतिम फेरी होणार आहे, अशी माहिती क्वीकहिलचे व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर, अकादमीचे अध्यक्ष प्रसाद पुरंदरे आणि राज्याच्या सायबर पोलीस शाखेचे पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही स्पर्धा ऑगस्ट महिन्यात सुरू झाली आहे. यामध्ये १००पेक्षा जास्त जणांनी प्रवेशिका पाठविल्या होत्या. पुणे, मुंबई, संभाजीनगर, कोल्हापूर, गोवा, नागपूर याचे ऑडिशन घेऊन अंतिम फेरीसाठी ९ संघांची निवड केली आहे. या स्पर्धेसाठी अभिनेता रितेश देशमुख, आनंद इंगळे आणि विजय केंकरे हे परीक्षक आहेत.

महाराष्ट्र सायबर पोलिसांकडून सायबर गुन्हे रोखण्यासाठी जनजागृती केली जाते. राज्यात सध्या ४७ सायबर पोलीस ठाणे आहेत, असे पोलीस अधीक्षक पांडकर यांनी सांगितले.